Register AD

दुरध्वनी: २५३६२९१६

# ठाणे महानगरपालिका

महानगरपालिका भवन, सरसेनानी जनरल अरुण कुमार वैद्य मार्ग, चंदनवाडी, पांचपाखाडी, ठाणे- 400602.

**THE MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF THANE**

ठामपा/प्रनिक/ ३५७ /२०२२-२३ /२४४२ **दिनांक : १०.०८.२०२२**

प्रति,
**मा.सदस्य सचिव**
कोकण विभागीय कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती,
तथा उप वनसंरक्षक,
कांदळवन कक्ष, मुंबई 400001

**विषय :-** तक्रार क्र.१५१ स्टॅलिन डी, यांची कांदळवन ऱ्हासाची तक्रार साकेत, ठाणे दिनांक- ३१.०५.२०२१.

**संदर्भ :-**सदस्य सचिव, राज्य कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती यांचे पत्र ल.ले/समिती/७२/२२-२३/ दिनांक-२१.०७.२०२२

उपरोक्त विषयान्वये स्टॅलिन डी तक्रारीच्या अनुषगांने दिनांक २२.०६.२०२२ रोजीच्या कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समितीमध्ये यांच्या मा. अध्यक्षांनी पुन्हा तक्रारदार सह स्थळ पाहणी करून याबाबत अहवाल संबंधीत नकाशे, छायाचित्रांसह सादर करण्याचे निर्देश दिले आहे. त्याअनुषंगाने दिनांक २३.०७.२०२२ रोजी तक्रारदार श्री. स्टॅलिन डी यांचे समवेत पाहणी केली. साकेत बाळकुम येथील ठामपातर्फे सुरू असलेल्या कामांबाबत पाहणी करताना सर्व नकाशे व परवानग्या दाखविण्यात आल्या. प्रत सोबत जोडलेली आहे.

सदर ठिकाणी साकेत रस्त्याच्या पलीकडे मोठ्या प्रमाणात खाडी प्रवाहाच्या बाजूने भरणी झाल्याबाबत तक्रारदाराने दर्शविले. सदर स्थळी पाहणी केली असता भरणी झाल्याचे आढळले. त्याबाबत फोटो सोबत जोडलेले आहेत. त्यानुसार सदर जागा मौजे माजीवाडे सिटी सर्वे नं ३८६/३ ही जागा पोलीस आयुक्त ठाणे शहर, यांच्या मालकीची आहे. सदर जागेचे संरक्षण व संवर्धन करण्याबाबत व भरणी काढण्याबाबत पत्र क्र. ठामपा/प्रनिक/ ३११/२२-२३ दिनांक-२६.०७.२०२२ अन्वये त्यांना कळविण्यात आलेले आहे. सोबत पत्राची प्रत जोडलेली आहे.

22/08/2022

**मनिषा प्रधान**
**मुख्य पर्यावरण अधिकारी तथा**
**सदस्य सचिव, ठामपा कांदळवन समिती**
ठाणे महानगरपालिका, ठाणे

मा. अतिरिक्त आयुक्त (२) सो., यांच्या मान्यतेने.

उप वनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई
आवक क्रमांक 309
दिनांक 22/08/22

D:\Letter and note\कांदळवन\A४ Letter २२-२३